# <u>फळसेवाडी हितकारी संस्था</u>

**लक्ष्मी पूजनाची सभा**

दिनांक 02 नोव्हेंबर 1993.

प्रिय बंधू भगिनीनो / मातांनो,

वरील संस्थेच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे "श्री लक्ष्मीपूजनचा" कार्यक्रम शनिवार दिनांक 13 नोव्हेंबर 1993 रोजी सायंकाळी ठीक 5:00 वाजता श्री मधूकर संभाजी राणे, अभ्युदय नगर, काळाचौकी, मुंबई – 400 013 येथे आयोजित करण्यात आलेला आहे. तरी सभासदांनी वेळेवर उपस्थित राहून लक्ष्मीपुजनाच्या कार्यक्रमास शोभा आणावी, हि नम्र विनंती.

सभेपुढील कामे – श्री लक्ष्मी पूजन

आपला

सुनिल सदानंद राणे
चिटणीस

# <u>फळसेवाडी हितकारी संस्था</u>
## लक्ष्मी पूजनाची सभा

**दिनांक** : शनिवार 13  नोव्हेंबर 1993
**स्थळ** : श्री मधुकर संभाजी राणे, अभ्युदय नगर, बिल्डिंग नं. 13, काळाचौकी, मुंबई – 400 013 यांचे घर

उपस्थिती

| | |
|---|---|
| 1. श्री वासुदेव बाबू राणे | 7. श्री अर्जून र राणे |
| 2. श्री अविनाश कृष्णाजी राणे | 8. श्री सत्यविजय शिवराम राणे |
| 3. श्री साबाजी त्रिंबक राणे | 9. श्री मधुकर संभाजी राणे |
| 4. श्री प्रशांत काशिनाथ राणे | 10. श्री सुनिल सदानंद राणे |
| 5. श्री श्रीधर आत्माराम राणे | 11. श्री उदय भगवान राणे |
| 6. श्री सुरेश रघुनाथ राणे | 12. श्री दिलिप मधुकर राणे |

उपरोक्त संस्थेची वरील बैठव वरील ठिकाणी 5:45 वाजता घेण्यात आली. या बैठकीस 12 सभासद  उपस्थित होते.

या सभेसाठी अध्यक्ष म्हणून श्री वासूदेव बाबू राणे यांची अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. सूचना – श्री श्रीधर आत्माराम राणे, अनुमोदन – श्री साबाजी त्रिंबक राणे.

सभेच्या प्रथेप्रमाणे अध्यक्षांच्या सूचनेप्रमाणे श्री मधुकर संभाजी राणे यांच्या हस्ते लक्ष्मीपूजनाचा कार्यक्रम पार पडला. सर्वांतर्फे देवीची प्रार्थना करण्यात आली.

तसेच श्री साबाजी त्रिंबक राणे यांना राष्ट्रपतीपदक "आर्दश शिक्षक पुरस्कार" मिळाल्याबद्दल सर्वांतर्फे हार्दिक अभिनंदन करण्यात आले. नंतर मागील सभेचे मिनिट वाचन करण्यात आले व ते मंजूर करण्यात आले.

तसेच सेक्रेटरी यांच्या वतीने वाडीतील पाणीप्रश्न कसा सोडवावा याबद्दल निवेदन करण्यात आले. भूजल सर्वेक्षण खात्यामार्फत जो अहवाल प्राप्त झालेला आहे त्याप्रमाणे नवीन विहीरीसाठी जागा उपलब्ध नाही. त्यामुळे विहीरीचा प्रश्न बारगळत आहे तसेच बोअरवेल बाबत देखिल प्रयत्न करून यश येत नाही यासाठी जवळजवळ रु.1000/- खर्च करण्यात आलेले आहेत. पुढील काळात आपल्याला नळ योजनेसाठी प्रयत्न करावे लागतील असे निवेदन करण्यात आले.

दुसरा मुद्द्यावर अशी चर्चा होती की ब्राह्मण विहीर 1956 साली बांधण्यात आलेली आहे त्यामुळे भविष्यकाळात लवकरात लवकर तिची दुरुस्ती होणे आवश्यक आहे. त्याबाबतीत विचार व्हावा नाहीतर पुढील काळात पाण्याचे हाल होतील.

ब्राह्मण मंदिराचा चौथरा – गावातील प्रतिष्ठित ग्रामस्थ श्री वामन राजाराम राणे यांची ब्राह्मण मंदिर चौथरा उभारण्याची इच्छा तरी मुंबईतील सर्व संस्थेच्या सभासदांची इच्छा असेल तर ते काम हाती घेणार आहेत व ज्यांना इतर सभासदांना

मदत द्यावयाची  त्यांची नावे देणगीदार म्हणून चौथऱ्यावर लिहीण्यात येतील. सभेचे अध्यक्ष श्री वासूदेव बाबू राणे यांनी सभाग्रहास अशी विनंती केली की हा निर्णय या ठिकाणी न घेता सर्वसाधारण सभेत घ्यावा असे सांगितले.

या ठिकाणी सर्वसाधारण सभा दिनांक 28 नोव्हेंबर 1993, शिरोडकर हायस्कूल, परेल या ठिकाणी आयोजित करण्यात आलेली आहे. तिचे परिपत्रक त्या ठिकाणी देण्यात आलेले आहे.

शेवटी पुन्हा एकदा संस्थेच्या वतिने खोली मालक श्री मधुकर संभाजी राणे व राणे कुटुंबियांनी चहापाणी व्यवस्था केल्याबद्दल आभार मानण्यात आले. तसेच संस्थेचे वयोवृध्द सभासद श्री वासुदेव बाबू राणे यांनी अध्यक्षस्थान स्विकारून कार्यक्रम पार पाडण्यास सहाय्य केले त्याबद्दल आभार मानण्यात आले व सर्व जमलेल्या सर्वांचे पुन्हा एकवार आभार मानून हा कार्यक्रम संपला असे जाहीर करण्यात आले. या प्रसंगी रु.66/- इतकी वर्गणी गोळा झाली.

---

| | |
|---|---|
| श्री सुनिल सदानंद राणे | श्री वासूदेव बाबू राणे |
| चिटणीस | अध्यक्ष |